रे.मु. नं. १३५/२०१८

**<u>निशाणी क्रमांक ३२ खालील आदेश</u>**

सदरचा अर्ज वादी यांनी वादी क्रमांक १ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेल्या विलंबमाफीसाठी दाखल केला आहे.

२. वादीने असे कथन केले आहे की, दाव्यातील वादी क्रमांक १ हे दिनांक २६.०५.२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यानंतर प्रकृतीच्या कारणास्तव वादीस वादी क्रमांक १ यांचे वारस वेळेत अभिलेखावर घेता आले नाहीत. जर विलंब माफी केली नाही तर वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादींनी अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला.

४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता, सदरचा दावा हा ठरावासाठी आहे. वादी क्रमांक १ यांच्या विरुध्द विलंब माफीसाठी पुरेशे कारण दाखविले आहे. वादीने अर्ज दाखल करण्यास विनाकारण विलंब केलेला आहे असे म्हणण्यास वाव नाही. उभयपक्षांमधील मुळ प्रश्न निकाली काढण्यासाठी व एकाच मुद्दयावर अनेक दावे टाळण्याच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. निशाणी क्रमांक ३२ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्रमांक १ यांचे वारस अभिलेखावर घेण्यात झालेला विलंब माफ करण्यात येतो.

Digitally signed by DESHPANDE PRITESH CHANDRASHEKHAR Date: 2022.12.16 11:26:54 +0530

पेण (प्रितेश देशपांडे)

दिनांक १३.१२.२०२२ सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पेण